# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. 832 ए, शिवाजीनगर पुणे 411004

दूरध्वनी क्र.:-020-29709396 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल : mscepune@gmail.com

जा.क्र. मरापप/स्विस/2024/26
दि.08/04/2024

परिपत्रक

## टंकलेखन संस्थांच्या ऑनलाईन नूतनीकरणासाठीची कार्यपद्धती

टंकलेखन संस्थाचालकांकडून 3, 5, 10 वर्षानंतर त्यांच्या संस्थेच्या नूतनीकरणाची प्रक्रिया करण्यात येत असते. यामध्ये संबंधित संस्थाचालकांना सर्व कागदपत्रांसह किमान 4 फाईल तयार करावे लागतात व त्या शिक्षणाधिकारी कार्यालयात जमा कराव्या लागतात. बऱ्याच वेळेला संस्थाचालकांच्या फायली हरवल्याची प्रकरणे देखील उद्भवलेली आहेत. वेळेवर प्रकरणे मंजूर न केल्याचे कारणावरून काही प्रकरणे मा. उच्च न्यायालयात देखील न्यायप्रविष्ठ झालेली आहेत.शिवाय नूतनीकरणाची फाईल नेमकी कुठे आहे? याबाबत देखील संस्थाचालकांना वेळोवेळी माहिती मिळत नाही. मागील वर्षी सप्टेंबर 2023 मध्ये विभागीय उपसंचालक यांच्याकडील ऑनलाइन नूतनीकरणाची प्रलंबितता जाणून घेतली असता, त्यामध्ये 1500 पेक्षा जास्त प्रकरणे उपसंचालक स्तरावर प्रलंबित होती व सर्व प्रकरणे ही 2017 व 2019 मध्ये सादर केलेली प्रकरणे होती.

नूतनीकरणाची प्रकरणे विनाविलंब, विहित मुदतीत व्हावीत व त्याचबरोबर नूतनीकरणाची कार्यवाही वेळेवर न केल्यास जबाबदारी देखील निश्चित करता यावी, याकरिता परीक्षा परिषदेतर्फे नूतनीकरणासाठी अर्ज करणे, तपासणी करणे व मंजुरी देण्याबाबतची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

1. आतापर्यंत नूतनीकरणाबाबतची संपूर्ण माहिती ही ऑफलाईन स्वरूपात होती. त्यामुळे सदर माहिती परीक्षा परिषदेला देखील उपलब्ध होत नव्हती. यापुढे नूतनीकरणाची संपूर्ण माहिती भरण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थाचालकांची राहील. नूतनीकरणासाठी ज्या संस्थाचालकांना अर्ज करावयाचा आहे, त्यांनी राज्य परीक्षा परिषदेतर्फे तयार करण्यात आलेल्या ऑनलाइन प्रोग्रॅमच्या माध्यमातूनच अर्ज करावयाचा आहे.
2. नुतनीकरणाच्या प्रोग्रामची लिंक सर्व संस्थाचालकांना त्यांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे.
3. नूतनीकरणाची माहिती ऑनलाईन भरताना संस्थाचालकांनी स्वतःचा फोटो, नमुना स्वाक्षरी, दैनंदिन वापर करावयाचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक इत्यादी माहिती देखील भरावयाची आहे.
4. नूतनीकरणाची माहिती यापुढे कायमस्वरूपी ऑनलाईन उपलब्ध राहणार आहे व या माध्यमातूनच यापुढे परवानगी देखील मिळणार असल्यामुळे नूतनीकरणासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क/प्रोसेसिंग फी आकारण्यात येत आहे :-

   3 वर्षाच्या नूतनीकरणासाठी - रु.1000/-,

5 वर्षाच्या नूतनीकरणासाठी - रु.3000/-,

10 वर्षाच्या नूतनीकरणासाठी - रु.5000/-.

हे शुल्क संस्थाचालकांनी माहिती भरल्यानंतर तात्काळ त्याच प्रोग्राममध्ये ऑनलाइन नेट बँकिंग ने भरावयाचे आहे. फी भरल्याशिवाय आपल्या नूतनीकरणाच्या अर्जावर कोणतीही प्रक्रिया होणार नाही.

5. नूतनीकरणासंबंधीची संपूर्ण माहिती भरण्याची जबाबदारी ही संस्थाचालकांची असून आवश्यक प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर व संपूर्ण माहिती सबमिट केल्यानंतर ती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे तपासणीसाठी उपलब्ध होईल. संस्थाचालक यांनी सदर सबमिट बटन दाबल्यानंतर लगेचच याबाबत इमेल द्वारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना संकेत मिळणार. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संस्थाचालकांकडील माहिती ऑनलाईन प्राप्त झाल्यानंतर, एक महिन्याचे आत तपासणी करून शिफारशीसह विभागीय उपसंचालक यांच्याकडे सबमिट बटन दाबून सादर करावयाची आहे. जर संस्थाचालकांनी भरलेल्या माहितीमध्ये त्रुटी असेल, तर तशी त्रुटी नमूद करून प्रकरण ऑनलाईन लगेचच संस्थाचालकांकडे माघारी पाठवायचे आहे. उपस्थित केलेली त्रुटी ही उपसंचालक आणि परीक्षा परिषदेस अवलोकन/पाहण्यास उपलब्ध असेल. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कडून शिफारस असल्याबाबतचे बटन सबमिट झाल्यानंतर पुढील एक महिन्याचे आत विभागीय उपसंचालक यांनी नूतनीकरणाच्या अर्जास मंजुरी द्यावयाची आहे. जर शिक्षणाधिकारी यांच्या शिफारसी मध्ये काही त्रुटी असल्यास, तसे सविस्तर त्रुटी नमूद करून ती फाईल ऑनलाईन परत संस्थाचालकांकडे पाठवील. संस्थाचालकांनी त्रुटी पूर्तता करून लगेचच ही फाईल पुन्हा विभागीय उपसंचालक यांच्याकडे ऑनलाईन सादर करावयाची आहे.पुनश्च त्रुटी पूर्तता करून सादर केल्यानंतर विभागीय उपसंचालक यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. शिक्षणाधिकारी यांनी विहित नमूद केलेल्या एका महिन्याचे आत जर विभागीय उपसंचालक यांच्याकडे ऑनलाइन फाईल सबमिट केली नाही, तर ती आपोआपच विभागीय उपसंचालक यांच्याकडे फॉरवर्ड होणार आहे. तथापि यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार नंतर आढळून आल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील. अशाच प्रकारे विभागीय उपसंचालक यांनी त्यांना निर्धारित करून दिलेल्या एक महिन्याचे आत मंजुरीची प्रक्रिया पार न पडल्यास, सदर नूतनीकरणाची फाईल आपोआपच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे ऑनलाईन पद्धतीने फॉरवर्ड होईल व परीक्षा परिषदेने देखील एक महिन्याचे आत सदर नूतनीकरणाच्या नसतीवर/प्रकरणावर निर्णय न घेतल्यास सदर नूतनीकरणाचे प्रकरण आपोआपच मंजूर होईल हे या ठिकाणी स्पष्ट करण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी किंवा उपसंचालक यांनी त्रुटी काढल्यानंतर मात्र संस्थाचालकांकडून त्रुटी पूर्तता झालेल्या तारखेपासून त्यांच्या तपासणी किंवा शिफारशीसाठी पुन्हा पुढील एक महिना मिळणार आहे.

6. आज रोजी परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थाचालकांच्या संस्थेचे जे ठिकाण नमूद केलेले आहे, त्यामध्ये मागील कालावधीत विभागीय उपसंचालक यांचे कडून स्थलांतरणाचा आदेश झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.असे असल्यास

संस्थाचालकांनी सॉफ्टवेअर मध्ये दिलेल्या जागी स्थलांतरणाच्या आदेशाची प्रत अपलोड करावयाची आहे.

7. शिक्षणाधिकारी,उपसंचालक किंवा परीक्षा परिषदेच्या तपासणीमध्ये संस्थाचालकांनी जर चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे निष्पन्न झाले, तर संबंधित संस्थाचालकाविरुद्ध गंभीर स्वरूपाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.त्यामध्ये तात्काळ संस्थेची मान्यता रद्द करण्यासारखे कठोर निर्णय देखील घेण्यात येतील.
8. सदर ऑनलाईन माहिती भरताना संस्थाचालकांनी केवळ मंगल फॉन्ट चाच वापर करावयाचा आहे.

नूतनीकरणाची माहिती सॉफ्टवेअर/प्रोग्राम मध्ये भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे प्रोग्रामर यांच्याशी संपर्क करावा.

1. श्री.नितीन किर्दकर मो.नं. 98604 85602. 2. श्री.विकास पवार मो.नं. 86692 89173.

**(डॉ. नंदकुमार बेडसे)**

**अध्यक्ष,**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे.**